# कार्यावली

## सोमवार, दिनांक ११ मार्च, २०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता
## मुंबई येथील विधान भवनात सुरु होणाऱ्या
## महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१३ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाची कार्यावली.

| | | |
|---|---|---|
| **एक** | : | राज्यपालांचे अभिभाषण. |
| **दोन** | : | राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव. |
| **तीन** | : | सभापतींनी, सभापती-तालिका नामनिर्देशित करणे. |
| **चार** | : | प्रश्नोत्तरे. |
| **पाच** | : | अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे. |
| **सहा** | : | राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा. |
| **सात** | : | सन २०१३-२०१४ चा अर्थसंकल्प सादर करणे. |
| **आठ** | : | सन २०१३-२०१४ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा. |
| **नऊ** | : | सन २०१२-२०१३ च्या पुरवणी मागण्या सादर करणे. |
| **दहा** | : | सन २०१२-२०१३ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा. |
| **अकरा** | : | लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे. |
| **बारा** | : | सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे. |
| **तेरा** | : | अंदाज समितीचे अहवाल सादर करणे. |
| **चौदा** | : | अनुसूचित जाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे. |
| **पंधरा** | : | विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे. |
| **सोळा** | : | पंचायती राज समितीचे अहवाल सादर करणे. |
| **सतरा** | : | रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे. |
| **अठरा** | : | विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करणे. |
| **एकोणीस** | : | उपविधान समितीचा अहवाल सादर करणे. |
| **वीस** | : | आश्वासन समितीचे अहवाल सादर करणे. |
| **एकवीस** | : | महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे. |
| **बावीस** | : | मंत्र्यांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे. |
| **तेवीस** | : | इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल. |
| **चोवीस** | : | शोक प्रस्ताव. |

**पंचवीस** : इतर प्रस्ताव.

**सव्वीस** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा- म.वि.प.नियम ९७ अन्वये.

**सत्तावीस** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधणे - म.वि.प.नियम १०१ अन्वये.

**अठ्ठावीस : अशासकीय विधेयके - विचारार्थ -**

**(१)** सन २०११ चे वि.प.वि. क्रमांक ८ - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, २०११. श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांचे.

**(२)** सन २०११ चे वि.प.वि.क्रमांक १३ - महाराष्ट्र सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) विधेयक, २०११. श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे.

**(३)** सन २०११ चे वि.प.वि. क्रमांक ९ - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक, २०११. श्री.विजय सावंत, वि.प.स. यांचे.

**(४)** सन २०११ चे वि.प.वि. क्रमांक ४ - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०११. श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांचे - चर्चा अपूर्णावस्थेत.

**(५)** सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक १ - महाराष्ट्र राज्य सेवा हमी विधेयक, २०१२. श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे.

**(६)** सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक २ - महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती ) विनियमन (सुधारणा) विधेयक, २०१२. श्री.रामनाथ मोते,वि.प.स. यांचे.

**(७)** सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक ३ - महाराष्ट्र पोलीस विधेयक, २०१२. श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांचे.

**(८)** सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक ४ - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, २०१२. श्री. चंद्रकात पाटील, वि.प.स. यांचे.

**(९)** सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक ६ - महाराष्ट्र भिषक व शल्यचिकित्सक (दिवाणी व फौजदारी खटल्यापासून मुक्त ठेवणे) विधेयक, २०१२. डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचे.

**(१०)** सन २०१२ चे वि.प.वि.क्रमांक ८ - महाराष्ट्र सक्तीचे निर्बीजीकरण विधेयक, २०१२. श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांचे.

**एकोणतीस : अशासकीय ठराव (म.वि.प. नियम १०२) -**

**श्री.जयंत पाटील यांचे ठराव क्रमांक १,२,३,४ व ५**

(१) '' राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, मुंबई- गोवा (वडखळ नाका) नाशिक शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनाची वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गांवर शासनाने ट्रॉमा केअर सेंटर सुरू करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२) '' राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३) '' राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र विकसित करण्याबाबत तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(४) '' कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्या दृष्टीने पाण्याची निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे वीज निर्मितीनंतर वशिष्ठ नदीच्या (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी कोकणातील जिल्ह्यांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या पाण्याची समस्या/दुष्काळ दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने चिपळूण तालुक्यातील वशिष्ठ नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून (लिफ्टिंग) निसर्गाच्या गुरूत्वाकर्षणाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरिता शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५) '' राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**डॉ.रणजित पाटील यांचे ठराव क्रमांक ८ व ९**

(८) '' राज्यातील अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, येथील सुशिक्षित बेरोजगारांचे व पदवीधरांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधीत प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९) '' विर्दभात सिंचनाच्या अपुऱ्या सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नापिक नुकसान सहन करीत असून अनेक सिंचन विषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन विर्दभात सिंचनविषयक प्रगती होण्याचे दृष्टीने मोठया प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्रीमती शोभाताई फडणवीस यांचे ठराव क्रमांक ११,१२,१३,१४ व १५**

(११) '' राज्यातील खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पिछेहाट लक्षात घेता क्रीडाक्षेत्राचा सर्वांगीण विकास करणे तसेच दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, राज्यात देशी खेळांकडे दुर्लक्ष झालेले असून देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागातील होतकरु व तरुण खेळाडू देशी खेळामध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रिडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी प्रोत्साहनपर योजना राबविण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२) '' नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे क्षतीग्रस्त झालेले शेतकरी पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे वंचित राहत असणे. याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारीत आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार

करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका, घ्यावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." ''

(१३) '' राज्यात महिलांवरील अत्याचाऱ्यांचे प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणे, त्यातच हुंडाबळी, अल्पवयीन मुलींवरील बलात्कार व खून यांचे प्रमाण मोठया प्रमाणात असणे, भारतात राज्याचा नंबर महिलावरील अत्याचारात ४ था असणे, त्यातच न्यायालयातही अशा केसेसला न्याय न मिळणे, राज्यात न्यायालयात अंदाजे १ लाख २७ हजार महिलांच्या केसेस प्रलंबित असून त्यातील केवळ १०,००० केसेसचा निकाल लागणे व केवळ ४६८ केसेस मध्येच गुन्हेगारांना शिक्षा होणे, हे प्रमाण ०.५ टक्के ही नसणे, त्यामुळे सुटलेल्या गुंडाकडून पुन्हा अत्याचाराची निर्माण झालेली भिती, ह्यावर शासनाने कडक कारवाई करण्याची आवश्यकता, महिलांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, शासनाने गुन्हेगारांना कठोर शिक्षा करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४) '' राज्यातील कृषी पंपाचे एकूण २ लाख ८० हजार वीज कनेक्शन द्यावयाचे असून त्यापैकी केवळ १ लाख ३० हजार ७३७ वीज कनेक्शन दिले जाणे, त्यामुळे राज्यातील आवश्यक असलेल्या अर्ध्याहून अधिक कृषी पंपाचे वीज कनेक्शन दिले न गेल्यामुळे शेतकरी सिंचनापासून वंचित राहून शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होणे, ट्रान्सफार्मरवर ज्यादा कनेक्शन असल्यामुळे ट्रान्सफार्मर उडण्याचे घडत असलेले प्रकार ह्याकरिता ज्यादा ट्रान्सफार्मर देण्याची गरज, अर्थसंकल्पीय अधिवेशनात २ लाख ८० हजार कृषी पंपांना वीज देण्याचे दिलेले आश्वासन अद्याप त्यावर न झालेली कारवाई विचारात घेवून खरीप व रब्बी पिक घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना वीज कनेक्शन देण्याबाबत शासनाने ठोस उपाय योजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१५) '' राज्यात विशेषतः विदर्भातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जागा मोठया प्रमाणात रिक्त असणे, त्यांतही काही उद्योजकांनी जागा खरेदी करुन उद्योग सुरू न करणे, तसेच नागपूर विभागात २६८७ उद्योग असून केवळ ०.७१ हजार एवढाच रोजगार उपलब्ध होणे, अमरावती विभागात १५८९ उद्योग सुरू असून केवळ ०.१९ हजार रोजगार उपलब्ध होणे, तसेच बुटीबोरी (नागपूर विभाग) या पंचतारांकित औद्योगिक वसाहतीत १९९९ पासून नवीन उद्योग येणे बंद होणे, तसेच बुटीबोरी येथील निवासी भूखंडाची ५३,५३६ चौ.मिटर एकूण जागेची अतिरिक्त मागणी करुनही एप्रिल २०११ ला प्रस्ताव पाठवून ही परवानगी न मिळणे, वर्धा एम.आय.डी.सी.तील ५० टक्के जागेत उद्योजकांनी जागा घेवूनही १० टक्के उद्योग अद्याप सुरू न होणे, ३ टक्के उद्योजकांनी केवळ निवासी बंगले बांधून जागेचा केलेला गैरव्यवहार, त्यामुळे महामंडळात रोजगारांना रोजगार मिळेल हा शासनाचा उद्देश असून तो सफल न होणे, महामंडळाच्या विकासाला बसलेली खिळ वारंवार जनतेत व कामगारांमध्ये पसरलेला असंतोष याबाबत शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.धनंजय मुंडे यांचे ठराव क्रमांक १६,१७,१८,१९ व २०**

(१६) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण, नोकरी व रोजगाराअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य, शासनाने बंद केलेला सुशिक्षित बेरोजगार भत्ता, रोजगाराच्या भाग भांडवलासाठी बँकासारख्या आर्थिक संस्थाकडून येणाऱ्या अडचणी, या बाबी विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, सुशिक्षित बेरोजगारांना पुन्हा भत्ता सुरू करावा, रोजगारासाठी भागभांडवलाची सोय करावी व बंदी घालण्यात आलेली नोकर भरती पुन्हा सुरू करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१७) '' नामाकिंत कंपन्यांच्या औषधाच्या किंमती भरमसाठ असल्यामुळे ही महागाची औषधे खरेदी करुन उपचार करणे, राज्यातील गोरगरीब सामान्य जनतेला परवडणारे नाही. त्यामुळे औषधांअभावी अनेक रुग्णांना मृत्यूला सामोरे जावे लागते, जेनेरिक औषधांचा गुणही नामांकित कंपन्यांच्या औषधांप्रमाणेच येतो, तसेच जेनेरिक औषधांच्या किंमतीही अतिशय कमी असतात व त्या गोरगरीब सामान्य जनतेला घेणे शक्य आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने राजस्थान राज्याप्रमाणेच जेनेरिक औषधे खरेदी करून नागरिकांना ती उपलब्ध करून द्यावीत, तसेच राज्यातील सर्व गावांमधून जेनेरिक औषधांची दुकाने सुरु करण्यास प्रोत्साहन द्यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१८) '' राज्यातील स्त्री-भ्रूण हत्यांचे प्रमाण वाढत असल्यामुळे भविष्यात सामाजिक दरी निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. स्त्री भ्रूण हत्यांचे प्रमाण रोखण्यासाठी आणि मुला-मुलींचा जन्मदर समान पातळीवर रहावा, यासाठी शासनाने स्त्री-भ्रूण हत्या विरोधी कायदा अधिक कडक करून स्त्री-भ्रूण हत्या करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यासाठी उपाय योजना कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१९) '' महाराष्ट्रातील थोर संत श्री शिरोमणी नरहरी महाराज यांचे कार्य समाजउध्दारासाठी प्रेरणादायक आहे. त्यांच्या कार्याचा प्रसार होणे हे समाजाच्या दृष्टीने भूषणावह आहे. त्यामुळे श्री. संत शिरोमणी नरहरी महाराज यांचे टपाल तिकीट काढण्याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." ''

(२०) '' राज्यातील ऊसतोड कामगार ऊस तोडणीसाठी वर्षातील ८ महिने घराबाहेर राहत असल्यामुळे व त्यांच्या सोबत त्यांचे संपूर्ण कुटुंबही ऊस तोडणीसाठी स्थलांतरित होत असल्यामुळे त्यांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे, या ऊसतोड कामगारांच्या मुलांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्यातील प्रत्येक तालुक्यात ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी निवासी शाळा सुरू कराव्यात, ऊसतोडणी कामगारांच्या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी शासकीय वस्तीगृहांमधून निवासाची व भोजनाची व्यवस्था करावी, तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या धर्तीवर ऊसतोडणी कामगारांच्या मुलांना शाळा, महाविद्यालयांमार्फत शिष्यवृत्ती व शुल्क सवलत

देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**डॉ.नीलम गोऱ्हे यांचे ठराव क्रमांक २१,२२,२३ व २४**

(२१) '' महिला आर्थिक विकास महामंडळाची २० जानेवारी, २००३ रोजी पुनर्रचना करण्यात येऊन ५ फेब्रुवारी, २००७ रोजी या महामंडळाला शिखरसंस्था म्हणून घोषित करण्यात आले आहे. राज्यात बचत गटांचे कामकाज ग्रामविकास, नगरविकास, आदिवासी कल्याण, महिला बालकल्याण, सामाजिक न्याय व सहकार खात्याशी संलग्न पतपेढ्या, तसेच कृषि विभागाशी संबधित विविध संस्थांमार्फत चालविले जात आहे. परंतु त्यात सध्या समन्वय नसल्याने महाराष्ट्र स्तरावर यांसर्व बचत गटांमध्ये सुसूत्रीकरण, मार्गदर्शन, संस्थात्मक सक्षमीकरण या कामांसाठी महिला आर्थिक विकास महामंडळाला ५० कोटी रुपये निधी भागभांडवल व कार्यक्रमाचा आराखडा बनविण्यास देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२२) '' राज्याच्या ग्रामीण भागामध्ये आदिवासी महिला तसेच सामाजिकदृष्टया वंचित घटकांना स्थानिक पातळीवर न्याय व संरक्षण मिळावे, यासाठी तंटा मुक्ती समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. त्याचधर्तीवर शहरी भागातसुध्दा तंटा मुक्ती समित्या स्थापन करण्यात याव्या व अदखलपात्र गुन्हांचा निपटारा करून समाजात सलोख्याचे वातावरण निर्माण व्हावे म्हणून शासनाने याबाबत तातडीने निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करावी अशी ही विधानपरिषद शासनास शिफारस करीत आहे ''

(२३) '' सुमारे २१०० कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वरील अपघातांचे प्रमाण खूपच वाढत आहे. अलिकडे प्रख्यात अभिनेते आनंद अभ्यंकर, अक्षय पेंडसे यांचे उर्से फाट्याजवळ अशाच एका अपघातात झालेले मृत्यू, तसेच याच ठिकाणी यापूर्वी देखील अनेक अपघात झालेले असणे, या सर्व बाबी विचारात घेऊन या एक्सप्रेस वे वर दुभाजकांची उंची वाढविणे, खोल असलेले चर खणून, वाहन चालकांकडून होत असलेले वेग मर्यादेचे उल्लंघन रोखणे, ठराविक अंतरावर स्वंतत्र पोलीस ठाणे उभारुन पोलीसांची गस्त वाढविणे, ट्रामा केअर सेंटर उभारणे इत्यादी बाबींची त्वरीत पुतर्ता करण्याच्या दृष्टीने शासनाने एक विशेष मोहिम आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२४) '' जिल्हा सातारा येथील मांढरदेवीच्या यात्रेमध्ये दिनांक २५ जानेवारी, २००५ रोजी झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेची चौकशी करण्याकरीता न्या.कोचर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. रुंद रस्ते, पायऱ्या, सुरक्षा आणि तातडीची आरोग्य सेवा इत्यादी संदर्भात पुरेशा सोई करण्यात आलेल्या नाहीत. राज्यात अशी अनेक धार्मिक स्थळे असून त्या ठिकाणी दरवर्षी भाविकांचे वाढते प्रमाण विचारात घेता मांढरदेवीसारखी दुर्घटना पुन्हा घडू नये यादृष्टीने न्या.कोचर यांच्या समितीने केलेल्या शिफारशींवर त्वरीत कार्यवाही करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.रामदास कदम यांचे ठराव क्रमांक २६,२७,२८,२९ व ३०**

(२६) '' मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(२७) '' राज्यात विशेषत: कोकणात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्यादृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२८) '' राज्यातील पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देवून त्याठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व त्यायोगे तेथील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी तसेच यासर्व पर्यटन स्थळांचे महत्व कायम राखण्याच्यादृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२९) '' कोकणातील विशेषत: रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्हयातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी कोयना धरणाचे पाणी व या दोन्ही जिल्हयात सर्वात जास्त पाऊस कोकणात पडतो, सदर पावसाचे पाणी अडवून ते कोकणातील वरकस जमिनीला देण्यासाठी पाणी पुरविण्याचेदृष्टीने शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून त्यांची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३०) '' कोकणात सिंचनाच्या अपुऱ्या सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नापिकी आणि नुकसान सहन करीत असून अनेक सिंचनविषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेवून कोकणाची सिंचनविषयक प्रगती होण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.दिवाकर रावते यांचे ठराव क्रमांक ३१,३२,३३ व ११५**

(३१) '' मराठी भाषेसाठी राज्य शासनाने स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा घेतलेला निर्णय, सदर विभागासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करुन स्वतंत्र सचिवांची नियुक्ती करण्याचा व त्यांच्या कक्षेत भाषा संचालनालय व इतर कार्यालये देण्याचा घेतलेला निर्णय, तरी राज्यातील ग्रामपंचायत स्तरापासून मंत्रालय स्तरापर्यंत आणि ग्रामपंचायत सदस्यांपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयात तसेच राज्याच्या एकंदरीत सर्वच व्यवहारामध्ये मराठीचा १०० टक्के वापर होण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे, तसेच, कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अथवा त्यात कसूर करण्याऱ्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची जबाबदारी देखील राज्य शासनाने मराठी भाषा विभागाकडे सोपविण्याचा निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३२) '' राज्य शासनाने अधिकारी / कमर्चारी यांच्या बदल्याबाबत अधिनियम केला आहे, बदली करण्यात आलेले काही अधिकारी/ कर्मचारी राज्य शासनाच्या आदेशाविरुध्द मॅटमध्ये जातात. बदली आदेशास स्थगिती मिळवितात. सदर स्थगितीच्या कालावधीत बदली केलेले अधिकारी/ कमर्चारी वर्षानुवर्षे पूर्वीच्याच जागेवर राहतात. त्यामुळे बदल्याबाबतचा कायदा परिणामशून्य होतो. परिणामी बदल्यासंदर्भात केलेल्या अधिनियमाखालील हेतू सफल होत नाही व अशी प्रकरणे दिवसेंदिवस वाढत चालली आहेत हे विचारात घेवून शासनाने आवश्यक ती कडक उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३३) '' "मुंबई शहरामध्ये अत्यंत मोक्याच्या जागेवर असलेल्या अनेक खाजगी मिल मालकांच्या तसेच राष्ट्रीयकृत कापड गिरण्या बंद पडल्यानंतर गिरण्या ज्याठिकाणी होत्या, त्या जमिनीला भरमसाठ भाव आल्यामुळे जमिन मालकांनी बंद पडलेल्या (नफ्यातील गिरण्यासुध्दा) गिरण्याखालील जमिन विकून त्याठिकाणी गगनचुंबी, इमारती, मॉल खाजगी कंपन्यांच्या इमारती बांधकामास सुरुवात केली, परंतु सदर जुन्या गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कामगार व त्यांच्या कुटुंबियांना मात्र गिरण्यांच्या जागी उभ्या राहणाऱ्या इमारतींमध्ये राहण्याच्या जागा दिल्या नाहीत. तसेच मॉल, कार्यालय यामध्ये नोकऱ्यासुध्दा दिलेल्या नाहीत, गिरणीच्या जमिनीपैकी विहित हिस्सा महापालिका म्हाडा यांना द्यावयाचा आहे. परंतु अनेक मालकांनी जमिनी म्हाडा व महापालिकेस दिलेल्या नाहीत. ६७,००० घरे गिरणी कामगारांच्या करीता बांधणार असे आश्वासन शासनाकडून देण्यात आलेले आहे. तथापि बांधलेली ६,९०० घरे गिरणी कामगारांना केव्हा वितरीत करण्यात येणार आणि राहिलेली ६०,००० घरे केव्हा बांधणार याबद्दल शासनाकडून कोणताही खुलासा नाही. तसेच गिरण्यांच्या चाळीत राहणाऱ्या कामगारांना ३०० चौ.फूटाच्या खोल्या देखील मिळाल्या नाहीत. गेल्या १० वर्षात अनेक कामगार मृत झाले. वर्षानुवर्ष गिरण्यांमध्ये काम केलेल्या कामगारांना गिरण्यांच्या जागेवर घरे देण्याची मागणी शासनाकडे तसेच म्हाडाकडे अनेक वर्षापासून केली जात आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री,गृहनिर्माण मंत्री, राज्यमंत्री यांचेकडे गिरणी कामगारांना माफक दरात घरे देण्याबाबत अनेक वेळा चर्चा झालेली आहे. तथापि अद्यापपर्यंत गिरणी कामगारांना घरे मिळालेली नाहीत. म्हणून मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देण्याच्या दृष्टिने शासनाने विहित मर्यादेचा (टाईम बॉउंड) कार्यक्रम

आखून त्यांची अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(११५) '' संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या आंदोलनात मृत्यूमुखी पडलेल्या १०५ व्यक्तींना राज्य शासनाने हुतात्म्यांचा दर्जा दिला आहे. त्याप्रमाणेच महाराष्ट्र-कर्नाटक सीमा आंदोलनात १९६९ मध्ये मृत्यूमुखी पडलेल्या ६९ मराठी व्यक्तींनाही राज्य शासनाने हुतात्म्यांचा दर्जा द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**डॉ.दिपक सावंत यांचे ठराव क्रमांक ३४ व ३५**

(३४) '' राज्यातील रुग्णांना भासणारी रक्ताची निकड आणि रक्तदानाचे महत्व विचारात घेवून सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान होणे गरजेचे आहे. यासाठी रक्त संक्रमण परिषदेने फक्त रक्तदान दिवस साजरा न करता त्यांना विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी शासनाने या परिषदेस विशेष निधी द्यावा व त्यासाठी विशेष समिती नेमून त्यांचे नियंत्रण करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे ''

(३५) '' राज्यातील ग्रामीण आरोग्य व्यवस्था सुधारण्याकरिता जिल्हा पातळीवर असलेल्या जिल्हा रुग्णालयांमध्ये (Civil Hospital) सी.पी.एस. सारखे अभ्यासक्रम सुरू करण्याची नितांत आवश्यकता, ज्यामध्ये शल्य चिकित्सा शास्त्र अभ्यासक्रम (Non Surgical Faculty) सोडून इतर आवश्यक अभ्यासक्रमांचा समावेश असेल, त्यामुळे ग्रामीण रुणांना योग्य आरोग्य सेवा उपलब्ध होईल. यामध्ये बाल रोगतज्ञ, त्वचा रोगतज्ञ, विकृतिशास्त्रज्ञ (Pathologist) इत्यादी विविध अभ्यासक्रम देखील अंतर्भूत करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करित आहे. ''

**श्री.चंद्रकांत पाटील यांचे ठराव क्रमांक ३७,३८,३९,४० व ४१**

(३७) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तीर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, यामध्ये अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने तशा योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

(३८) '' वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासनातर्फे व महानगरपालिकांतर्फे रुग्णवाहिका सुरु न करणे, तसेच अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा आकस्मिक दुखणे, यामुळे सर्वसामान्य लोकांना रुग्णवाहिका सेवा तात्काळ उपलब्ध न होणे, त्यासाठी सामाजिक किंवा राजकीय संस्थांनी विभागा-विभागातून जनसेवेच्या उदात्त हेतूने

रुग्णवाहिका सुरु केल्या आहेत, अशा रुग्णवाहिकांसाठी शासनातर्फे आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३९) '' राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४०) '' राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(४१) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.किरण पावसकर यांचे ठराव क्रमांक ४२,४३,४४,४५ व ४६**

(४२) '' कोकणातील विशेषत: रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग व ठाणे या चार जिल्हयांसाठी एक स्वतंत्र मत्स्य विद्यापीठ स्थापन करुन त्यात मत्स्यव्यवसायासंबंधी विविध अभ्यासक्रम अंतर्भूत करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४३) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच, संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४४) '' राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याबाबत तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व

पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(४५) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने हया विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४६) '' कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांची वाढती संख्या विचारात घेता हा मार्ग दुपदरी (सेंकड ट्रॅक) करण्याची आवश्यकता, तसेच या रेल्वेमार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी किमान पत्र्याची कायमस्वरुपी शेड उभारणे, सुलभ शौचालये व अन्य सुविधाअभावी महिला प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेता तेथे सुलभ शौचालय व अन्य अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.संदिप बाजोरिया यांचे ठराव क्रमांक ४७,४८,४९,५० व ५१**

(४७) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगारांअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षांत घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४८) '' विदर्भातील हातमाग विणकरांच्या जटील बनत चाललेल्या विविध समस्या, तसेच त्यांची होत असलेली आर्थिक दुरावस्था व हलाखीचे जीवन, त्यात सुधारणा होण्याच्या दृष्टीने शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे.''

(४९) '' राज्यात अनेक ठिकाणी धरणासारख्या प्रकल्पांमध्ये ज्यांची घरे व जमिनी गेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची कामे विनाविलंब व निश्चितपणे पूर्ण होतील, या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५०) '' नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे. याला शंभर वर्ष जुनी

ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारीत आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." ''

(५१) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा" अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**डॉ. अपूर्व हिरे यांचे ठराव क्रमांक ५२,५३,५४,५५ व ५६**

(५२) '' राज्यातील शिक्षणाच्या गरजेनुसार ८००० मराठी शाळांच्या मान्यतेसाठी असलेली मागणी, शासनाच्या दिरंगाईच्या धोरणामुळे मराठी माध्यमाच्या बंद पडत चाललेल्या शाळा, परीणामी मराठी भाषा व मराठी शाळांचे अस्तित्व व भवितव्य धोक्यात येणे, मराठी भाषेचे संवर्धन व्हावे व मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडू नयेत, तसेच ८००० शाळांना विनाविलंब मान्यता देण्याची नितांत आवश्यकता विचारात घेवून शासनाने तातडीने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५३) '' शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा वा महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा वा महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५४) '' राज्यात महिला बचत गटांना सक्षम करुन त्यातून उत्पन्न होणाऱ्या रोजगाराची संधी वाढविण्यासाठी शासनातर्फेमहिला बचत गटांना शून्य टक्के व्याज दराने कर्ज पुरवठा करण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५५) '' नाशिक हे राज्याच्या सुवर्ण चतु:ष्कोनातील एक महत्वाचे शहर असल्याने नाशिक शहराला लागून असलेल्या ग्रामीण भागाचे झपाटयाने शहरीकरण होत आहे. त्यामुळे येथील पायाभूत सुविधांचा नियोजनबध्द विकास होण्यासाठी एमएमआरडीए मुंबईच्या धर्तीवर "नाशिक नगर विकास प्राधिकरण" कार्यान्वीत करुन ह्या प्राधिकरणाला निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५६) '' राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोग शाळा, ग्रंथालये इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत

परिणाम विचारात घेता विना अनुदान तत्त्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.दिपकराव साळुंखे यांचे ठराव क्रमांक ५७,५९,६० व ६१**

(५७) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५९) '' केंद्र सरकारने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्राम सडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६०) '' राज्यातील सर्व शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी कर्जे ४ टक्के व्याजाच्या दराने पुरविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६१) '' राज्यातील ग्रामीण भागातील जिल्हापरिषद शाळांची झालेली दयनीय अवस्था विचारात घेऊन शाळांसाठी कंपाऊंड वॉल, पाण्याची सुविधा, मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, वृक्षारोपण यासाठी महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषदांना आवश्यक तो विशेष निधी देण्याच्या दृष्टीने कारवाई करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.सतीश चव्हाण यांचे ठराव क्रमांक ६२,६३,६४,६५ व ६६**

(६२) '' राज्यात दिवसेंदिवस वाढत चालेलली महागाई तसेच सेवायोजन कार्यालयात नाव नोंदणी करुनही सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी प्राप्त न होणे. सेवायोजन कार्यालयाकडून १९८५ पासून नोकरीसाठी मुलाखत पत्र न देणे, परिणामी बेरोजगारांना चरितार्थासाठी कोणतेही साधन उपलब्ध न झाल्याने चरितार्थ चालविणे जिकरीचे झाले आहे. म्हणून पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील ३ वर्षात नोकरी न मिळालेल्या बेरोजगारांना आर्थिक मदत म्हणून प्रतिमहा रुपये १५००/- बेकार भत्ता देण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६३) '' राज्यातील खेळाडूंची राष्ट्रीय स्तरावर होत असलेली पिछेहाट लक्षात घेता क्रीडा क्षेत्राचा सर्वांगीण विकास होण्याकरीता व दर्जेदार खेळाडू तयार करण्यासाठी तालुकास्तरावर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यात यावीत व त्यासाठी प्रशिक्षित

मार्गदर्शक नेमण्यात यावेत व अशा केंद्राना आवश्यक ते साहित्य पुरविण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६४) '' राष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्याच्या तुलनेत या राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्यासाठी व उमेदवारांची अद्ययावत व योग्य पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६५) '' केंद्र सरकारने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्राम सडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६६) '' राज्यातील ग्रामीण भागातील जिल्हापरिषद शाळांची झालेली दयनीय अवस्था विचारात घेऊन शाळांसाठी कंपाऊंड वॉल, पाण्याची सुविधा, मुले व मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, वृक्षारोपण यासाठी महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषदांना आवश्यक तो विशेष निधी देण्याच्या दृष्टीने कारवाई करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.रमेश शेंडगे यांचे ठराव क्रमांक ६७,६८ व ६९**

(६७) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६८) '' शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६९) '' राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणाऱ्या गावकऱ्यांना त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, व आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**श्री.विक्रम काळे यांचे ठराव क्रमांक ७०,७१,७२ व ७४**

(७०) '' शासनातर्फे राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा वा महाविद्यालयामार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत दिली जाते त्याच धर्तीवर राज्यातील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील पाल्यांना शाळा व महाविद्यालयांमार्फत स्कॉलरशिप व शुल्क सवलत देण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७१) '' राज्यात सातत्याने वाढणारी लोकसंख्या, दिवसेंदिवस वाढणारी वाहनांची संख्या, परिणामी दररोजच्या अपघातात होणारी जिवितहानी टाळण्यासाठी राज्यातील सर्व राष्ट्रीय व राज्यमार्ग तसेच जिल्ह्या-जिल्ह्याला जोडणारे रस्ते हे चौपदरी करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७२) '' केंद्र सरकारने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्राम सडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७४) '' पुणे, पिंपरी-चिंचवड व पुणे ग्रामीण भागाचे वेगाने होणारे शहरीकरण, त्या मानाने या भागात रस्त्यांचा विकास न झाल्याने वाहतुकीची होत असलेली प्रचंड कोंडी, सुलभ व जलद वाहतुकीसाठी तेथे सोईसुविधांचा असलेला अभाव, या परिस्थितीवर तोडगा निघावा यासाठी पुणे-पिंपरी- चिंचवड व पुणे शहराच्या आसपासच्या भागाच्या विकासासाठी मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर पुणे विकास प्राधिकरण नेमून त्याकरिता शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.हेमंत टकले यांचे ठराव क्रमांक ७५,७६,७७,७८ व ७९**

(७५) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तीर्थक्षेत्राकडे लाखोच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, तसेच अनेक जण गंभीर जखमी होणे, या घटना क्लेशदायक असल्यामुळे आता यापुढे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने तशा योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

(७६) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी

शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्यासाठी काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७७) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययनाचे काम करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा" अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७८) '' राज्यातील शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(७९) '' राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

**श्री.विनायक राऊत यांचे ठराव क्रमांक ८०,८१,८२,८३ व ८४**

(८०) '' कोकण रेल्वे सुरु होऊन सुमारे १३ वर्षाहून अधिक कालावधी लोटला तरीही आजमितीस या मार्गावर एकमार्गी (Singal Track) वाहतूक सुरू असणे, कोकणातील जनतेने या मार्गासाठी आवश्यक असलेली आपली बहुमूल्य जमिन कोकण रेल्वेसाठी उपलब्ध करुन दिलेली असतानाही कोकणातील विशेषत: सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील जनतेसाठी मोजक्याच रेल्वे गाड्या असल्याने या रेल्वेचा विशेष फायदा कोकणातील जनतेला होत नसल्याकारणाने कोकण रेल्वे एकेरी मार्गाचे विस्तारीकरणे करुन दुहेरी मार्ग सुरू करण्याच्या दृष्टीने तसेच कोकणातील प्रवाशांच्या संख्येत वाढ झाल्याने प्रवाशांच्या सोयीसाठी आरक्षण वाढविणे, या रेल्वे मार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांसाठी पत्र्याची शेड उभारणे, महिला प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेता तेथे सुलभ शौचालय व अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८१) '' कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्या दृष्टीने पाण्याची निर्माण होत असलेली समस्या

सोडविण्यासाठी कोयना धरणाचे विजनिर्मितीनंतर वाशिष्ठी नदीच्या (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी कोकणातील जिल्ह्यांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या पाण्याची समस्या/दुष्काळ दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने चिपळूण तालुक्यातील वाशिष्ठी नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून (लिफ्टिंग) निसर्गाच्या गुरूत्वाकर्षणाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरिता शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८२) '' मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीबाबत शासनाचे उदासीन धोरण, तसेच मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींची दुरुस्ती होत नसल्याने प्रत्येकवर्षी ऐन पावसाळ्यात इमारती कोसळून जिवीत व वित्त हानी होण्याचे वाढते प्रमाण. म्हाडाकडून पावसाळ्यापूर्वी जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरीत्या पाहणी न होणे तसेच, पुनरचीत इमारतींची खोळंबलेली असंख्य कामे, त्यातून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराला मिळणारे उत्तेजन त्यामुळे रहिवांशात पसरलेला तीव्र असंतोष व त्याच्यांत वाढती असुरक्षितता. या संदर्भात शासनाने विचार करुन त्यावर परिणामकार उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८३) '' राज्यातील औद्योगिक वसाहती व कारखान्यांचे प्रमाण वाढत असल्यामुळे बहुतांश जिल्ह्यात वायु व जल प्रदुषणाचे प्रमाण वाढत असणे, त्यातच, कोळसा खाणींपासून होणारे प्रदुषण, उद्योजक कराररनामा करुनही प्रदुषणाबाबत असलेल्या नियमांचे उल्लंघन करीत असणे, अपुऱ्या साधन सामग्रीमुळे प्रदुषणाला आळा घालण्यात शासनास येत असलेले अपयश. परिणामी जनतेच्या आरोग्यास निर्माण झालेला गंभीर धोका विचारात घेऊन सर्वच स्तरावरील वाढत्या प्रदुषणाला आळा घालण्याकरीता शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद राज्य शासनास करीत आहे. ''

(८४) '' मुंबईतील छत्रपती शिवाजी टर्मिनस रेल्वे स्टेशनच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्रीमती अलका देसाई यांचे ठराव क्रमांक ८५,८६,८७,८८ व ८९**

(८५) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे व पदवीधरांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधीत प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८६) '' राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्यादृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८७) '' राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८८) '' कोकण पट्टीवरील विशेषत: ठाणे जिल्हयातील वसई पाचूबंदर, नायगाव कोळीवाडा, किल्ला बंदर येथील किनारपट्टीवरील मच्छीमारांच्या जेटी नादुरुस्त अवस्थेत असणे तसेच त्यांची उंची कमी असल्यामुळे समुद्राचे पाणी मोठयाप्रमाणात शिरुन मच्छीमार बांधवांचे नुकसान होत असणे, परिणामी मच्छीमार कोळी बांधवांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, या बंदरांची देखभाल व दुरुस्ती करून त्यांचा विकास करण्याच्यादृष्टीने शासनाने नियोजनबध्द व कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८९) '' राज्यात विना अनुदानित अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालयांना फी वाढीचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने विनाअनुदानित अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांच्या संचालकांनी फी मध्ये केलेली असमर्थनीय वाढ, सदर फी वाढीमुळे अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांमधून शिक्षण घेणे गरीब, हुशार व होतकरु विद्यार्थ्यांच्या आर्थिक कुवतीबाहेरचे होणे, परिणामी त्यांना अशा महत्वाच्या शिक्षणाला मुकावे लागणे, ही वस्तुस्थिती लक्षात घेता अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयामधील फी भरण्यासाठी अशा हुशार व गुणवान विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत शासनाने आर्थिक सहाय्य कर्जरुपाने उपलब्ध करुन द्यावे व शिक्षण पूर्ण झाल्यावर सदरहू कर्ज हप्त्याहप्त्याने वसूल करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.रामनाथ मोते यांचे ठराव क्रमांक ९०,९१,९२ व ९३**

(९०) '' औरंगाबाद व नागपूर येथील मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या धर्तीवर पुणे, सातारा, सांगली, सोलापूर व कोल्हापूर या जिल्ह्यातील जनतेच्या सोयीच्या दृष्टीने कोल्हापूर येथे मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची निर्मिती करण्यात यावी,

अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९१) '' राज्यातील सर्व धर्मादाय शैक्षणिक संस्थांचे प्रशासन होण्यासाठी सदर संस्थांचा कारभार पहाण्यासाठी स्वतंत्र धर्मादाय आयुक्तालयाची निर्मीती करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९२) '' मुंबई विद्यापीठाचा विस्तार व कार्यक्षेत्र लक्षात घेता मुंबई विद्यापीठाचे विभाजन करून कोकणासाठी स्वतंत्र विद्यापीठाची निर्मिती करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद करीत आहे. ''

(९३) '' स्काऊट आणि गाईड या विषयाचे महत्व लक्षात घेऊन या विषयाचा माध्यमिक शिक्षण स्तरावरील अभ्यासक्रमात "वैकल्पिक" ऐवजी "अनिवार्य" विषय म्हणून समावेश करण्यात यावा अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.जयवंतराव जाधव यांचे ठराव क्रमांक ९४,९५,९६,९७ व ९८**

(९४) '' राज्यातील समाजकल्याण, आदिवासी विकास विभाग आणि महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने ह्या विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम तयार करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९५) '' राज्यातील शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशके यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतीमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतीमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९६) '' राष्ट्रीय स्तरावरील भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा राज्यस्तरावरील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश परिक्षा, लोकसेवा आयोग व तत्सम स्पर्धात्मक परिक्षांमध्ये राष्ट्रीय स्तरावर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने उमेदवारांची योग्य प्रकारे व अद्ययावत पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक प्रशिक्षण केंद्र स्थापन करावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(९७) '' नाशिक हे राज्याच्या सुवर्ण चतु:ष्कोनातील एक महत्वाचे शहर असल्याने या शहराला लागून असलेल्या ग्रामीण भागाचे झपाटयाने शहरीकरण होत आहे. त्यामुळे येथील पायाभूत सुविधांचा नियोजनबध्द विकास होण्यासाठी एमएमआरडीए मुंबई,

नागपूर सुधार प्रन्यास व पुणे, पिंपरी चिंचवड महानगर प्राधिकरणच्या धर्तीवर "नाशिक क्षेत्र विकास प्राधिकरण" कार्यान्वीत स्थापन करुन हया प्राधिकरणाला निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(९८) '' महाराष्ट्र राज्यातील न्यायालयांमधील कामकाज इंग्रजी भाषेत केले जात आहे मात्र राज्यातील न्यायालयांचे कामकाज मराठी या मातृभाषेतून करण्यासाठी, मुंबई उच्च न्यायालयाची प्राधिकृत भाषा मराठी करण्यासाठी, भारतीय राज्यघटनेचे कलम ३४८(२) नुसार आवश्यक कार्यवाही करण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.मितेश भांगडिया यांचे ठराव क्रमांक ९९,१००,१०१ व १०२**

(९९) '' राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठ्यांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्यादृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१००) '' शिक्षण घेत असलेल्या सर्व आदिवासी मुला मुलींना शैक्षणिक प्रवासात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस मध्ये मोफत प्रवास करण्याची सवलत देण्यात यावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०१) '' राज्यात अनेक ठिकाणी धरणासारख्या प्रकल्पांमध्ये ज्यांची घरे व जमिनी गेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाची कामे विनाविलंब व निश्चितपणे पूर्ण होतील, या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०२) '' राज्यात विना अनुदानित अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालयांना फी वाढीचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने विनाअनुदानित अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांच्या संचालकांने फी मध्ये केलेली असमर्थनीय वाढ, सदर फी वाढीमुळे अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांमधून शिक्षण घेणे गरीब, हुशार व होतकरु विद्यार्थ्यांच्या आर्थिक कुवतीबाहेरचे होणे, परिणामी त्यांना अशा महत्वाच्या शिक्षणाला मुकावे लागणे, ही वस्तुस्थिती लक्षात घेता अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयामधील फी भरण्यासाठी अशा हुशार व गुणवान विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत शासनाने आर्थिक सहाय्य कर्जरुपाने उपलब्ध करुन द्यावे व शिक्षण पूर्ण झाल्यावर सदरहू कर्ज हप्त्याहप्त्याने वसूल करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.सुभाष चव्हाण यांचे ठराव क्रमांक १०३,१०४,१०५ व १०६**

(१०३) '' भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भारताची घटना लिहिली

असून त्यांची किर्ती संपूर्ण जगात पसरलेली आहे. भारतीय जनतेचे त्यांच्यावर अतिशय प्रेम आहे. भारतीय जनतेचे लाडके नेते डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे दादर येथील हिंदू कॉलनीतील राजगृह येथे राहत होते. दादर याच ठिकाणी त्यांचे स्मारक असून त्यांच्या वापरातील अनेक मौल्यवान वस्तू तेथे ठेवण्यात आलेल्या आहेत. दिनांक १४ एप्रिल व ६ डिसेंबर,या दिवशी महामानवाला अभिवादन करण्यासाठी देशातील लाखो अनुयायी याठिकाणी येत असतात. अशा या महामानवाचे नाव देशातील सर्व जनतेच्या चिरंतर स्मरणात राहण्यासाठी दादर रेल्वे स्थानकाचे "डॉ.बाबासाहेब आंबेडकर रेल्वे स्थानक" असे नामकरण करण्यासाठी राज्यातील सर्व अनुयायी यांनी अनेक वर्षापासून करण्यात आलेल्या मागणीचा विचार व्हावा व त्याबाबत आग्रही भूमिका केंद्र शासनाकडे राज्य शासनाने धरावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०४) '' ग्लोबल वार्मिंग रोखण्याच्या दृष्टीने राज्यात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम मोठया प्रमाणात राबविणे अत्यंत गरजेचे असल्याने राज्यातील स्वयंसेवी सामाजिक संस्थांना या उपक्रमासाठी उत्तेजनार्थ विशिष्ट योजना राबवाव्यात, यासाठी आर्थिक तरतूद व अन्य उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०५) '' कोकणात सिंचनाच्या अपूर्ण सोयी असल्यामुळे या भागातील शेतकरी वर्षानुवर्षे नापिक नुकसान सहन करीत असून अनेक सिंचन विषयक योजना/पाटबंधारे प्रकल्प अपूर्णावस्थेत असल्यामुळे शेतकऱ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन कोकणाची सिंचनविषयक प्रगती होण्याच्या दृष्टीने मोठया प्रमाणावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध करण्यात याव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०६) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता राज्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.संजय दत्त यांचे ठराव क्रमांक १०७,१०८,१०९,११० व १११**

(१०७) '' मुंबई शहरामध्ये अत्यंत मोक्याच्या जागेवर असलेल्या अनेक खाजगी मिल मालकांच्या तसेच राष्ट्रीयकृत कापड गिरण्या बंद पडल्यानंतर गिरण्या ज्याठिकाणी होत्या, त्या जमिनीला भरमसाठ भाव आल्यामुळे जमिन मालकांनी बंद पडलेल्या (नफ्यातील गिरण्यासुध्दा) गिरण्याखालील जमिन विकून त्याठिकाणी गगनचुंबी, इमारती, मॉल खाजगी कंपन्यांच्या इमारती बांधकामास सुरुवात केली, परंतु सदर जुन्या गिरण्यांमध्ये काम करणाऱ्या कामगार व त्यांच्या कुटुंबियांना मात्र गिरण्यांच्या जागी उभ्या राहणाऱ्या इमारतींमध्ये राहण्याच्या जागा दिल्या नाहीत. तसेच मॉल, कार्यालय यामध्ये नोक-यासुध्दा दिलेल्या नाहीत, गिरणीच्या जमिनीपैकी विहित हिस्सा महापालिका म्हाडा यांना द्यावयाचा आहे. परंतु अनेक मालकांनी जमिनी म्हाडा व

महापालिकेस दिलेल्या नाहीत. ६७,००० घरे गिरणी कामगारांकरीता बांधणार असे आश्वासन शासनाकडून देण्यात आलेले आहे. तथापि बांधलेली ६,९०० घरे गिरणी कामगारांना केव्हा वितरीत करण्यात येणार आणि राहिलेली ६०,००० घरे केव्हा बांधणार याबद्दल शासनाकडून कोणताही खुलासा नाही. तसेच गिरण्यांच्या चाळीत राहणाऱ्या कामगारांना ३०० चौ.फूटाच्या खोल्या देखील मिळाल्या नाहीत. गेल्या १० वर्षात अनेक कामगार मृत झाले. वर्षानुवर्ष गिरण्यांमध्ये काम केलेल्या कामगारांना गिरण्यांच्या जागेवर घरे देण्याची मागणी शासनाकडे तसेच म्हाडाकडे अनेक वर्षापासून केली जात आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री,गृहनिर्माण मंत्री, राज्यमंत्री यांचेकडे गिरणी कामगारांना माफक दरात घरे देण्याबाबत अनेक वेळा चर्चा झालेली आहे. तथापि अद्यापपर्यंत गिरणी कामगारांना घरे मिळालेली नाहीत. म्हणून मुंबईतील गिरणी कामगारांना घरे देण्याच्या दृष्टिने शासनाने विहित मर्यादेचा (टाईम बाँड) कार्यक्रम आखून त्यांची अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१०८) '' मराठी भाषेसाठी राज्य शासनाने स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा नुकताच घेतलेला निर्णय, सदर विभागासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करुन स्वतंत्र सचिवांची नियुक्ती करण्याचा व त्यांच्या कक्षेत भाषा संचालनालय व इतर कार्यालये देण्याचा घेतलेला निर्णय, तरी राज्यातील ग्रामपंचायत स्तरापासून मंत्रालय स्तरापर्यंत आणि ग्रामपंचायत सदस्यांपासून मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयात तसेच राज्याच्या एकंदरीत सर्वच व्यवहारामध्ये मराठीचा १०० टक्के वापर करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अथवा त्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची जबाबदारी देखील राज्य शासनाने मराठी भाषा विभागाकडे सोपविण्याचा निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१०९) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, तसेच अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याची नितांत आवश्यकता विचारात घेवून योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

(११०) '' राज्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गावर मोठया प्रमाणात होत असलेले अपघात, अपघातस्थळी अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी शासकीय रुग्णालये नसणे, या अपघातग्रस्तांवर उपचार करण्यासाठी राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्ग येथे सार्वजनिक आरोग्य विभाग माध्यमातून लहान-लहान उपचार केंद्रे सुरु झाल्यास येथे वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्सेस व इतर कर्मचारी नेमणूक केली गेली तर सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळून राज्यातील बेरोजगारी दूर होण्यास मदत होईल तसेच अपघातग्रस्तांवर वेळीच उपचार होतील. म्हणून राज्यमार्ग व राष्ट्रीय महामार्गावर ५०

कि.मी. अंतरावर प्रत्येक ठिकाणी एक-एक उपचार केंद्र उघडण्यात यावे अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(१११) '' राज्यातील पोलिसांना २४ तासाहून अधिक तास काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यावर दिवसेंदिवस कामाचा ताण वाढत आहे. तसेच पुरेशी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसल्यामुळे, अनेक पोलिसांना भाडयाच्याच घरात राहावे लागत आहे. शासनाकडून देण्यात आलेल्या शासकीय निवासाची अत्यंत दुरावस्था आहे, कामाचा ताण, गृहनिर्माणाचा प्रश्न, यामुळे त्यांच्यात निर्माण होत असलेले तणावाचे वातावरण, परिणामी त्यांच्यावर मानसिक ताण वाढत असून त्यांच्यात आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. म्हणून पोलिसांच्या कार्यक्षमतेचा सर्वंकष विचार होऊन त्यांच्या कामाचे तास, एक साप्ताहिक सुटी, निवासस्थाने इत्यादी मुलभूत समस्यांबाबत कायमस्वरुपी तोडगा काढण्याच्यादृष्टीने शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**डॉ.सुधीर तांबे यांचे ठराव क्रमांक  ११२,११३ व ११४**

(११२) '' राज्यातील लोकसंख्येत विविध अपंगांचे ३ टक्क्याहून अधिक प्रमाण आहे. यात बरेच मूकबधीर, अंध मतिमंद अस्थिव्यंग अशी वर्गवारी आहे. अपंगाच्या पुनर्वसनासाठी योग्य ती प्रभावी योजना नाही. अपंगाना दर्जेदार शिक्षण दिल्यास त्यांचे प्रभावी पुनर्वसन होऊ शकते. प्रचलित शिक्षण व्यवस्थेत अपंगासाठी स्वतंत्र अभ्यासक्रम उपलब्ध नाही. त्यांच्या असलेल्या अपंगत्वाचा व त्यांच्या शक्तीस्थानांचा विचार करून त्यांच्या शिक्षणसाठी स्वतंत्र अभ्यासमंडळ निर्माण करण्याची शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.
''

(११३) '' राज्यात पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी सुमारे १ लाख अंगणवाड्या आहेत. संख्या समाधानकारक जरी असली तरी या अंगणवाड्याद्वारे दर्जेदार पूर्व प्राथमिक शिक्षण मिळत नाही. वैद्यकीय शास्त्रानुसार लहान मुलांच्या मेंदूची ९० टक्के वाढ ही ६ वर्षापर्यंत होत असते. शैक्षणिक आवड निर्माण होणे, ज्ञानेद्रियांचा योग्य विकास होणे, तसेच बौध्दिक विकासाच्या दृष्टीने हा कालावधी अत्यंत महत्वाचा आहे. यासाठी दर्जेदार पूर्व प्राथमिक शिक्षण देण्यासाठी समिती गठीत करून विशेष कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११४) '' राज्यातील शेतकऱ्यांवर नेहमीच दुष्काळाची छाया पसरलेली असते. कधी ओला दुष्काळ तर कधी सुका दुष्काळ ही परिस्थिती शेतकऱ्यांवर नेहमीच येत असते. यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होतात व यातून त्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सध्या गोवा सरकारने शेतकऱ्यांना पेन्शन योजना सुरु केल्या आहेत त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही राज्यातील दारिद्रय रेषेखालील शेतकऱ्यांना पेन्शन योजना सुरु करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.अनिल भोसले यांचे ठराव क्रमांक  ११७,११८,१२० व १२१**

(११७) '' मानवतेचे महाभाष्याकार असलेल्या श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचे उचित स्मारक उभारुन त्यांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या नेवासे परिसराचा सर्वांगिण विकास करण्यासाठी शासनाने एक कालबध्द योजना आखून त्याची त्वरेने अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(११८) '' पुणे शहरात दिवसेंदिवस वाहनांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ होत असल्याने वाहतुकीची होणारी कोंडी, अपघातात होत असलेली वाढ, यामुळे पुणे शहाराच्या वाहतुकीचा झालेला जटील प्रश्न, याबाबत पुणे शहाराच्या गतिशीलतेसाठी सर्वकष आराखडा तयार करुन त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(१२०) '' पुणे, पिंपरी-चिंचवड व पुणे ग्रामीण भागाचे वेगाने होणारे शहरीकरण, त्या मानाने या भागात रस्त्यांचा विकास न झाल्याने वाहतुकीची होत असलेली प्रचंड कोंडी, सुलभ व जलद वाहतुकीसाठी तेथे सोईसुविधांचा असलेला अभाव, या परिस्थितीवर तोडगा निघावा यासाठी पुणे-पिंपरी- चिंचवड व पुणे शहराच्या आसपासच्या भागाच्या विकासासाठी मुंबई प्रदेश विकास प्राधिकरणाच्या धर्तीवर पुणे विकास प्राधिकरण नेमून त्याकरिता शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन द्यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२१) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व यांच्यात रोजगारांअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षांत घेता बेरोजगारीची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप यांचे ठराव क्रमांक १२२,१२३,१२४,१२५ व १२६**

(१२२) '' मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२३) '' मुंबईसह राज्यात सदनिकांच्या किंमती प्रचंड प्रमाणात वाढ होणे, सदरहू सदनिकांच्या किंमती मूळ किंमतीपेक्षा कितीतरी पट अधिक असल्याने सर्वसामान्य

जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करुन स्थिर ठेवण्याची राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी राज्य शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(१२४) '' राज्यात अनेक कुटूंबाचे योग्य सर्वेक्षण न झाल्याने त्यांना दारिद्र्य रेषेखालील पिवळ्या शिधापत्रिकापासून वंचित रहावे लागत असणे, शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने रुपये १५,०००/- वार्षिक उत्पन्न ही दारिद्र्यरेषेची मर्यादा १० वर्षापूर्वी ठरविली असणे, मात्र, शासनाने नेहरु रोजगार व सुवर्ण जयंती योजनेसाठी दारिद्र्य रेषेची मर्यादा रुपये २५,०००/- ठरवितांना त्यामध्ये स्वतःच्या मालकीचे घर, रंगीत टि.व्ही., गॅस, दुचाकी वाहन या अटी शिथिल करणे, एकाच शासनाने दारिद्र्य रेषेखाली असलेले दोन निकष हे विसंगत असणे, यात धान्य वाटपासाठी केंद्र शासनाने ६५.३४ लाख लाभार्थ्यांची संख्या ठरवून दिली असून प्रत्यक्षात ७३.४० लाख लाभार्थी निवडण्यात आले असणे, त्यामुळे केंद्राकडून मिळणारे धान्य अपुरे असणे, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाची उत्पन्न मर्यादा रुपये १५,०००/- वरुन रुपये ५०,०००/- इतकी करण्यात यावी व केंद्र शासनाकडून अतिरिक्त धान्याचा कोटा राज्यास देण्याची शासनाने आग्रही मागणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२५) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगारांअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षांत घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२६) '' राज्यात रस्त्यावरील वाहनांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ, त्यामानाने रस्ते अरुंद तसेच वाहतुक सिग्नल योग्य नसल्याने व राज्यातील द्रुतगती मार्गाची योग्य ती देखभाल होत नसल्याने राज्यात वाहनांच्या अपघातात झालेली लक्षणीय वाढ, रस्त्यावरील अपघातामुळे होणारी जिवित व वित्तहानी लक्षात घेता राज्यातील रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाय सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याबाबत ही विधानपरिषद शासनास शिफारस करीत आहे. ''

**ॲड.आशिष शेलार यांचे ठराव क्रमांक १२७ व १२८**

(१२७) '' मुंबई शहरात दिवसेंदिवस वाहनांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने वाहतुकीची होणारी कोंडी, अपघातात होत असलेली वाढ, त्यामुळे कर्कश हॉर्न वाजवून होत असलेले ध्वनी प्रदुषण व अनधिकृतरित्या वाढत असलेली पार्कींग, यासाठी मुंबई शहरासाठी सर्वकष आराखडा तयार करुन त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१२८) '' राज्यात दिवसेंदिवस जमिनीवरील व भूगर्भातील पाण्याची पातळी वेगाने कमी होत असणे, तसेच पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली समस्या, यामुळे पिण्याच्या पाण्याचा व शेतीच्या पाण्याचा दिवसेंदिवस ज्वलंत होत असलेला प्रश्न सोडविण्यासाठी धरण, तलाव व जलसाठयांच्या जलसंधारणांचा कार्यक्रम प्रभावीरित्या राबविण्यासाठी तसेच, पाण्याच्या योग्य नियोजनासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.अमरसिंह पंडित यांचे ठराव क्रमांक १२९,१३०,१३१,१३२ व १३३**

(१२९) '' राज्यात विशेषतः मराठवाडयात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट समस्या लक्षात घेता पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीपणे सोडविण्यासाठी धरण, तलाव आदी जलसाठयांतील पाण्याच्या उपलब्धतेचे व वापराचे नियोजन करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१३०) '' राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे प्रणेते कै.वसंतराव नाईक यांनी राज्याच्या कृषी क्षेत्रात केलेले अतुलनीय कार्य, त्यांचे कार्य व स्मृती संस्मरणीय ठेवण्यासाठी त्यांचे नाव मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी या कृषी विद्यापीठास देण्यात यावे, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(१३१) '' सामुहीक विवाह सोहळ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून अशा सामुहीक विवाह सोहळ्यात विवाह बध्द होणाऱ्या दाम्पत्यांना आणि सामुहीक सोहळे आयोजित करणाऱ्या सेवाभावी संस्थांना अर्थसहाय्य तसेच अनुदान देण्याची योजना शासनाने त्वरित आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१३२) '' राज्यातील विशेषतः मराठवाडयातील सर्व गावे बारमाही वाहतूकीस योग्य व्हावीत तेथे नद्या, नाले व मोऱ्या यांच्यावरील पुलांची बांधकामे दुरूस्ती करून ग्रामीण भागातील रस्ते वाहतुकीस योग्य करण्यासाठी धडक योजना शासनाने हाती घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१३३) '' मराठवाड्याच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेले अहमदनगर-बीड-परळी, सोलापूर-बीड-जळगाव या नविन रेल्वे मार्गाचे काम सत्वर हाती घेण्यासाठी कोकण रेल्वे मंडळाच्या धर्तीवर एक स्वायत्त रेल्वे मंडळ स्थापन करुन हे रेल्वे मार्ग विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

**श्रीमती विद्या चव्हाण यांचे ठराव क्रमांक १३४,१३५,१३६ व १३७**

(१३४) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषतः उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत

असलेली भीषण पाणी टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी कमी करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१३५) '' राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी, यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१३६) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तिर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याची नितांत आवश्यकता विचारात घेवून योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

(१३७) '' मुंबईसह राज्यात मोठ्या प्रमाणात रस्त्यावर थुंकणे, कचरा टाकणे, अस्वच्छता ठेवणे असे प्रकार घडत असून यामुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात खर्च याठिकाणी स्वच्छता राखण्यात होत आहे. अशाप्रकारच्या बेशिस्त वागण्यावर नियंत्रण आणण्यासाठी व लोकांमध्ये समाजाप्रती व देशाप्रती नैतिकता जागरुक करुन स्वत:च्या जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याकरीता शालेय शिक्षणापासून नागरिक शास्त्र हा विषय १०० गुणांसाठी करुन त्यांतून चांगला माणूस निर्माण करणारे शिक्षण देण्याचा कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.विजय सावंत यांचे ठराव क्रमांक १३८,१३९,१४०,१४१ व १४२**

(१३८) '' भारताचे व वेंगुर्ल्याचे सुपुत्र डॉ.द्वारकानाथ कोटणीस यांची चिरंतन स्मृती जपण्यासाठी चीनमध्ये एका रुग्णालयास त्यांचे नाव देण्यात आले आहे; मात्र भारतात त्यांचे कुठेही स्मारक नाही, सन २००९-१० हे डॉ.कोटणीसांचे जन्म शताब्दी वर्ष होऊन गेले तरी देखील वेंगुर्ला येथे अद्यापपावेतो त्यांचे स्मारक उभारण्यात आलेले नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेता डॉ.कोटणीसांचे वेंगुर्ला (जिल्हा सिंधुदूर्ग) येथे स्मारक उभारण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१३९) '' कोकणातील सागरी किनारपट्टीलगतच्या गावांना समुद्राच्या खाऱ्या

पाण्यापासून होणाऱ्या नुकसानीपासून वाचविण्यासाठी तज्ञांची एक समिती नेमून सागरी अतिक्रमण बचावासाठी एक मास्टर प्लॅन तयार करण्यात यावा व त्याची युध्दपातळीवर अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(१४०) '' राज्यातील अनेक ठिकाणी धरणासारख्या प्रकल्पांमध्यें ज्यांची घरे व जमिनी गेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम विनाविलंब व निश्चितपणे पूर्ण होऊ शकेल, या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४१) '' राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठयांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे ''

(१४२) '' कोकण रेल्वे मार्गावरील प्रवाशांची वाढती संख्या विचारात घेता हा मार्ग दुपदरी (सेंकड ट्रॅक) करण्याची आवश्यकता, तसेच या रेल्वेमार्गावरील प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी किमान पत्र्याची कायमस्वरुपी शेड उभारणे, सुलभ शौचालये व अन्य सुविधाअभावी प्रवाशांची विशेषत: महिला प्रवाशांची होत असलेली गैरसोय लक्षात घेंता तेथे तातडीने शौचालये व अन्य अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रह धरावा, अशी शिफारस ही विधानपरिषद राज्य शासनास करीत आहे. ''

**श्री.जयप्रकाश छाजेड यांचे ठराव क्रमांक १४३,१४४ व १४५**

(१४३) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगारांअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षांत घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच संबंधित प्रश्नांवर उपाययोजना सुचविण्यासाठी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यांत यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४४) '' राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेला दर्जा लक्षात घेता व प्रकरणी आमुलाग्र सुधारणा करण्यासाठी शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४५) '' राज्यात कायदा व सुव्यवस्थेची दिवसेंदिवस ढासळत चाललेली परिस्थिती, तसेच पोलिसांना गुन्हे शोधून काढण्यात येत असलेले अपयश, वाढत्या गुन्हेगारीमुळे ग्रामीण व शहरी भागातील जनतेत निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना विचारात घेता, या संदर्भात अभ्यास करुन निश्चित उपाय सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही

सदनातील सदस्यांची एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.राणा जगजितसिंह पाटील यांचे ठराव क्रमांक १४७ व १४८**

(१४७) '' केंद्र सरकारने राज्यात मुख्य रस्त्यापासून खेडे गावांना जोडण्याकरिता पंतप्रधान ग्राम सडक योजना अंमलात आणलेली आहे. त्याच धर्तीवर राज्यात पांदण रस्ता दुरुस्ती व मुख्यमंत्री सडक योजना राज्य शासनाने सुरु कराव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४८) '' मुंबईसह राज्यात सदनिकांच्या किंमती प्रचंड प्रमाणात वाढणे, सदरहू सदनिकांच्या किंमती मूळ किंमतीपेक्षा कितीतरी पट अधिक असल्याने सर्वसामान्य ग्राहक जनतेस सदनिका खरेदी करणे आवाक्याबाहेर जाणे, सर्वसामान्य जनतेला मोठे घर घेण्याची ऐपत नसल्यामुळे त्यांच्यासाठी लहान घरे बांधण्याची विकासकांवर सक्ती करण्याची आवश्यकता, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करुन स्थिर ठेवण्याची राज्यातील जनतेकडून होत असलेली मागणी, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी खाजगी बांधकाम व्यवसायिकांनी खरेदी केलेली जमिन आणि बांधकामाचा खर्च गृहीत धरुन एरियावाईज प्रति चौरस फूट याप्रमाणे शासनाने घरांच्या किंमती जाहीर करुन व वाढते दर नियंत्रित करुन सर्वसामान्य जनतेला परवडतील अशा किंमतीत घर देण्याबाबत राज्य शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

**तीस** : सर्वसाधारण सार्वजनिक हितसंबंधाच्या बाबी.

**एकतीस** : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी स्वंतत्रपणे वितरीत करण्यात आली आहे.)

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ७ मार्च, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानपरिषद.